**B**

SL. No. : XX

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 ]
Total No. of Questions : 50 ]

**CCE RR**
**UN-REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 21. 03. 2019 ] [ Date : 21. 03. 2019

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 09-30 A.M. to 12-30 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 50 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

Tear here

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारीत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 11 × 1 = 11

1. चिमाजी आप्पा कोणत्या स्वारीला निघाले ?
2. 'वाटणी' या पाठाचे लेखक कोण ?
3. लेखकाला रोज किती भाकरी खायला मिळ ?
4. कल्पतरू कोणत्या इच्छा पुरवितो ?
5. माहेरी आंब्याना तोटा का नाही ?
6. फिरंग्याची बायको कशी होती ?
7. तात्यांच्या घरी पंचमंडळी का जमली होती ?
8. रूक्मिणीच्या गुरूचे नाव काय ?
9. आईने थळोबास कोणता नवस केला ?
10. खंडोजी माणकरने कोणते कार्य पत्करले ?
11. तात्यांनी किती वाटण्या करण्यास सांगितल्या ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 6 × 2 = 12

12. आंधळ्यानी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?
13. लेखक चिं. वि. जोशी यांचा परिचय लिहा.

14. ''कंदिल घेऊन जा आणि याना गाडीत बसवून या'' संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

15. हवा असलेला शकून सांगण्यासाठी कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो ?

16. पाहुण्यांचे वर्तन कसे आहे ?

17. 'जाळणारा तिला संसाराचा वणवा' संदर्भासहित स्पष्ट करा.

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : $8 \times 3 = 24$

18. विद्येसाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले ?

19. लेखकाने पावसाळ्याचा हिशेब कसा मांडला आहे ?

20. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

21. लेखकाचा उत्साह का कळंजून गेला ?

22. 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे ?

23. समाजसेवक कोणत्या भावनेने सेवा करतात ?

24. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण-कोण कशाप्रकारे प्रयत्न करोत आहेत ?

25. धरण बांधणाऱ्या स्त्रीला कोणते कष्ट सोसावे लागले ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : $5 \times 4 = 20$

26. 'हिरवे सांगाती' या पाठात लेखकाने कोणकोणत्या झाडांचे वर्णन केले आहे ? कसे ?

27. सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या हे सविस्तर स्पष्ट करा.

28. 'या भारतात बंधूभाव' या कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

29. तृणपात्याच्या सत्काराचे वर्णन करा.

30. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा –

काया मातीत ............................................................

............................................................................

............................................................................

.................................................... भूल जीवाला पडते.

## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारीत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

31. 'सदाचार' ही संधी कशी सोडवतात ?

(अ) सदा + आचार (ब) सत् + आचार

(क) सद् + आचार (ड) सदा + चार.

32. ने, ए, शी हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत ?

(अ) प्रथमा (ब) द्वितीया

(क) तृतीया (ड) चतुर्थी.

33. 'विनायक पुस्तक वाचतो.' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे.

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) यापैकी नाही.

34. 'मी सैन्यात भरती होईन.' या वाक्यातोल काळ ओळखा.

(अ) वर्तमान काळ (ब) भूत काळ

(क) साधा भूत काळ (ड) भविष्य काळ.

35. पै दक्षिणा, लक्ष ........... म्हण पूर्ण करा.

(अ) प्रदक्षिणा (ब) वरदक्षिणा

(क) अवलक्षणा (ड) सुलक्षणा.

36. मुलांनो, शांतता राखा. वाक्यप्रकार ओळखा.

(अ) प्रश्नार्थी (ब) केवल वाक्य

(क) उद्गारवाचक (ड) आज्ञार्थी.

37. 'पंचपाळ' हा या प्रकारचा समास आहे.

(अ) कर्मधारय (ब) अव्ययीभाव

(क) द्विगू (ड) समाहार द्वंद्व.

38. 'आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे' शब्दसमहास एक शब्द द्या.

(अ) वार्षिक (ब) साप्ताहिक

(क) पाक्षिक (ड) दैनिक.

39. तो पाणी गटागटा प्याला. या वाक्यातील 'गटागटा' या शब्दाची जात ओळखा.

(अ) क्रियाविशेषण (ब) क्रियापद

(क) विशेषण (ड) नाम.

40. संस्कृतमधून जसेच्या तसे आलेल्या शब्दांना काय म्हणतात ?

(अ) तद्भव (ब) तत्सम

(क) देशी (ड) परभाषिय.

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : 4 × 1 = 4

41. सदाचारी : दूराचारी : : आस्तिक : ..............

42. ? : प्रश्न चिन्ह : : ‘ ’ : ..............

43. सदन : घर : : वारा : ..............

44. सांडणी : उंट : : लांडोर : ..............

VII. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेनुसार लिहा : 3 × 2 = 6

45. ‘विद्या हे शस्त्र आहे’

अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

46. ‘मना सज्जना भक्तिपंथेचि जावे’

गण पाडून वृत्त ओळखा.

47. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

अ) जिव्हारी झोंबणे

ब) बेत करणे.

## विभाग-C
## ( लेखन व रचनेवर आधारीत )

VIII. 48. खालीलपैको कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

अ) ग्रंथ हेच गुरू

ब) अति तेथे माती.

IX. 49. तुमच्या मित्राचा चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक आला असे समजून त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. 5

**किंवा**

परीक्षा कालावधीत कर्णकर्कश आवाज निर्माण करणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमावर बंदी घालण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांना अर्ज लिहा.

X. 50. खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा : $1 \times 5 = 5$

अ) माझा आवडता खेळ

ब) पर्यावरण प्रदूषण – एक समस्या

क) टी. व्ही. शाप की वरदान ?